209

# MAHARASHTRA ACT No. XXIV OF 1984.

## THE PROVINCIAL SMALL CAUSE COURTS AND PRESIDENCY SMALL CAUSE COURTS (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1984.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १८ ऑगस्ट १९८४ रोजी मिळाली असल्यामुळे, तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XXIV OF 1984.

## AN ACT, FURTHER TO AMEND PROVIINCIAL SMALL CAUSE COURTS ACT, 1887 AND THE PRESIDENCY SMALL CAUSE COURTS ACT, 1882, IN THEIR APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २४ ऑगस्ट १९८४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

## सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

**प्रांतिक लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८७ आणि इलाखा शहर लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८२, हे महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१८८७ चा ९. १८८२ चा १५.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, प्रांतिक लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८७, आणि इलाखा शहर लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८२, हे महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पस्तिसाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, प्रांतिक लघुवाद न्यायालय व इलाखा शहर लघुवाद न्यायालय (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८४ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा तारखेस अमलात येईल.

सन १८८७ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २७ ला कलम २५-क असा नवीन क्रमांक देणे.

२. प्रांतिक लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८७, हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), त्याचे कलम २७ याला उक्त अधिनियमाचे कलम २५-क असा नवीन क्रमांक देण्यात येईल.

१९४७ चा मुंबई ५७. १९५६ चा मुंबई २. १९४९ चा मुंबई. ५९. १९७७ चा महाराष्ट्र २८.

सन १८८७ चा अधिनियम क्रमांक ९ यात प्रकरण चार-क-१ आणि कलमे २६ ते २६-घ समाविष्ट करणे.

३. मुख्य अधिनियमाच्या अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या कलम २५-क नंतर पुढील प्रकरण व कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

"प्रकरण चार—क-१

विवक्षित स्थावर मालमत्तेचा ताबा परत मिळविणे आणि विवक्षित लायसन्स फी व भाडे यांची वसुली

इतर अधिनियम लागू असणारी प्रकरणे वगळून, लायसन्स देणारे व लायसन्स-धारक किंवा मालक व भाडेकरू यांच्यामधील स्थावर मालमत्तेचा ताबा परत मिळवणे आणि लायसन्स फी व भाडे यांची वसुली करणे यासाठी लघुवाद न्यायालयात दावे किंवा कार्यवाही दाखल करणे.

२६. (१) या अधिनियमात इतरत्र काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु पोट-कलम (२) च्या उपबंधांस अधीन राहून, लघुवाद न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमेतील क्षेत्रात असलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेचा ताबा परत मिळवण्याशी किंवा लायसन्स फी किंवा आकार किंवा तिचे भाडे वसूल करण्याशी संबंधित असणारे, लायसन्स देणारा व लायसन्सधारक यांच्यामधील, किंवा घरमालक व भाडेकरू यांच्यामधील सर्व दावे किंवा कार्यवाही या, अशा दाव्यांच्या किंवा कार्यवाहींच्या विषयवस्तूचे मूल्य लक्षात न घेता, दाखल करून घेण्याची व त्यांची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता लघुवाद न्यायालयास असेल.

१९६३ चा ३६.

१९८४ चा महाराष्ट्र २४.

भाग आठ—

१९४७ चा मुंबई ५७. १९५६ चा मुंबई २. १९४९ चा मुंबई. ५९. १९७७ चा महा. राष्ट्र २८.

(२) ज्यांना मुंबई भाडे नियंत्रण आणि पथिकाश्रम व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७, मुंबई सरकारी जागांतून काढून लावण्याबाबत अधिनियम, १९५५, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६, किंवा त्यावेळी अमलात असलेला अन्य कोणताही कायदा लागू आहे अशा कोणत्याही स्थावर मालमत्तेचा ताबा परत मिळवण्याची किंवा लायसन्स फी किंवा आकार किंवा तिचे भाडे वसूल करण्याची संबंधित दावे किंवा कार्यवाही यांना पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेला कोणताही मजकूर लागू होणार नाही.

अपील.

२६क. (१) कलम २६ अन्वये अधिकारितेचा वापर करणाऱ्या लघुवाद न्यायालयाने दिलेला हुकुमनामा किंवा आदेश यावरील अपील जिल्हा न्यायालयात दाखल करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) खालील प्रत्येक अपील, यथास्थिति, हुकुमनाम्याच्या किंवा आदेशाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत करण्यात येईल :

१९६३ चा ३६.

परंतु, या पोट-कलमाद्वारे विहित करण्यात आलेल्या कालमर्यादेची गणना करताना, मुदत अधिनियम, १९६३ याची कलमे ४, ५ आणि १२ यांत अंतर्भूत असलेले उपबंध, शक्य असेल तेथवर, लागू होतील.

(३) पोट-कलम (१) अन्वये केलेल्या अपिलावरील कोणत्याही निर्णयाविरुद्ध आणखी कोणतेही अपील दाखल करण्यात येणार नाही.

(४) लघुवाद न्यायालयाने निर्णय दिलेल्या कोणत्याही प्रकरणात काढलेला हुकुमनामा किंवा आदेश हा कायद्यानुसार होता याबद्दल स्वत:ची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी, जिल्हा न्यायालयास, ज्याच्या बाबतीत असा हुकुमनामा किंवा आदेश काढण्यात आला होता ते प्रकरण मागवून घेता येईल आणि त्यासंबंधात त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

हक्क अंतर्भूत असणाऱ्या दाव्यांची व्यावृत्ती.

२६ख. या प्रकरणात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही स्थावर मालमत्तेवरील हक्काबाबतचा प्रश्न ज्यात उद्भवतो आणि त्याचा निर्णय केला जातो अशा दाव्याच्या, अपिलाच्या किंवा कार्यवाहीच्या बाबतीत, त्यात उल्लेख केलेल्या कोणत्याही पक्षकारास, अशा मालमत्तेवरील आपला हक्क प्रस्थापित करण्याकरिता सक्षम न्यायालयात दावा दाखल करण्यास प्रतिबंध होत असल्याचे मानण्यात येणार नाही.

प्रांतिक लघुवाद प्रलंबित जिल्हा कार्यवाहीची व्यावृत्ती.

१९८४ चा महाराष्ट्र २४.

२६ग. या प्रकरणान्वये लघुवाद न्यायालयाने दखल घेण्याजोगे आणि प्रांतिक लघुवाद न्यायालय (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८४ अमलात येण्याच्या तारखेस जिल्हा न्यायालयात किंवा दिवाणी न्यायाधीशाच्या न्यायालयात प्रलंबित असलेले सर्व दावे आणि इतर कार्यवाही या, जणू काही हे प्रकरण अधिनियमित झाले नव्हते असे समजून, यथास्थिति, जिल्हा न्यायालयाकडून किंवा दिवाणी न्यायाधिशांच्या न्यायालयाकडून चालू ठेवण्यात येतील आणि निकालात काढण्यात येतील ".

सन १८८७ अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३२ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ३२, पोट-कलम (१) मध्ये, "प्रकरणे तीन व चार" या मजकुराऐवजी "प्रकरणे तीन, चार आणि चार-क-१" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८८७ अधिनियम क्रमांक ९ याच्या दुसऱ्या अनुसूचीची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये,—

(अ) खंड (४) वगळण्यात येईल ;

(ब) खंड (८) वगळण्यात येईल ;

(क) खंड १३ मध्ये शेवटच्या "दावा" या शब्दानंतर "; परंतु ज्या बाबतीत हक्क हा लेखनिर्दिष्ट केलेल्या संविदेवर आधारलेला असेल अशा कोणत्याही दाव्याचा त्यात समावेश असणार नाही", हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ड) खंड (२५) वगळण्यात येईल ;

(इ) खंड (२६) वगळण्यात येईल ;

(फ) खंड (३८) मध्ये, शेवटच्या "दावा" या शब्दानंतर "; परंतु ज्या बाबतीत हक्क हा लेखनिर्दिष्ट केलेल्या संविदेवर आधारलेला असेल अशा कोणत्याही दाव्याचा त्यात समावेश असणार नाही," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १८८२ अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४१ ची सुधारणा.

१८८२ चा १५.

६. इलाखा शहर लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८२ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्याच्या कलम ४१ मध्ये,—

१९४८ चा ६९.

(१) पोट-कलम (१) यातील "किंवा त्यावेळी अमलात असलेला इतर कोणताही कायदा" हा मजकूर वगळण्यात येईल.

१९७७ चा महाराष्ट्र २८.

(२) पोट-कलम (२) मध्ये "मुंबई गृहनिर्माण मंडळ अधिनियम, १९४८ किंवा त्यावेळी अमलात असलेला कोणताही इतर कायदा लागू असेल" या मजकुराऐवजी "महाराष्ट्र गृह-निर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ किंवा त्यावेळी अमलात असलेला इतर कोणताही कायदा लागू असेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

**न. ब. पाटील,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.